सोलापूर महानगरपालिका.

जा.क्र.-सोमपा/निवडणूक/ ४८२
निवडणूक कार्यालय.
दि.- १२/०३/२०१८

# सोलापूर महानगरपालिका, पोट निवडणूक- २०१८

## निवडणुकीची जाहीर सूचना.

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ अनुसूची 'ड' प्रकरण- १ निवडणूक नियम ८)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची 'ड' प्रकरण- १ निवडणूक नियम ८ मधील तरतुदी अन्वये निवडणूक सूचना जाहीर करीत आहे.

प्रभाग क्र.- १४ या निवडणूक प्रभाग मतदार संघातून बहुसदस्यीय निवड प्रणालीनुसार १ जागेवर सोलापूर महानगरपालिकेसाठी निवडणूक घ्यावयाची आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांनी पत्र क्र.- रानिआ/मनपा २०१८/प्र.क्र.२/का.५,दि. ०७ मार्च,२०१८ (परिशिष्ट- १) अन्वये सोलापूर महानगरपालिकेच्या पोट निवडणूक २०१८ निवडणुकीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे जाहीर केला आहे.

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | महानगरपालिका आयुक्त यांनी निवडणूक कार्यक्रमाची सूचना शासन राजपत्र व स्थानिक वृतपत्रात प्रसिध्द करण्याची तारीख | दि. १३/०३/२०१८ (मंगळवार) |
| २ | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरिता उपलब्ध असण्याचा कालावधी | १३/०३/२०१८ (मंगळवार) सकाळी ११.०० ते २०/०३/२०१८ (मंगळवार) दुपारी ३.०० पर्यंत |
| ३ | वरिल नामनिर्देशनपत्र स्विकारण्याचा कालावधी | १३/०३/२०१८ (मंगळवार) ते २०/०३/२०१८ (मंगळवार) (सकाळी ११.०० ते दुपारी ३.००) (रविवार दि.- १८/०३/२०१८ रोजी नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यात येणार नाहीत.) |
| ४ | नामनिर्देशनपत्रांची छाननी | २१/०३/२०१८ (बुधवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ५ | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच |
| ६ | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | २३/०३/२०१८ (शुक्रवार) (दुपारी ३.०० पर्यंत) |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | २४/०३/२०१८ (शनिवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ८ | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | २४/०३/२०१८ (शनिवार) |
| ९ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | ०६/०४/२०१८ (शुक्रवार) (सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत) |
| १० | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | ०७/०४/२०१८ (शनिवार) (सकाळी १०.०० पासून) |
| ११ | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे. | १०/०४/२०१८ (मंगळवार) पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांचे निर्देशानुसार मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडिल आदेश क्र. मह/आस्था २/आरआर-४३१/२०१८ दि.१२/०३/२०१८ अन्वये सोलापूर महानगरपालिका पोट निवडणूक २०१८ साठी खालील प्रमाणे रकाना क्र. २ मधील अधिकाऱ्यांची त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या रकाना क्र. ३ मधील प्रभागाकरिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. नामनिर्देशनपत्राचे वाटप व स्वीकृतीचे ठिकाण रकाना क्र. ४ मध्ये देण्यात आलेले आहे.

| अनुक्रमांक | निवडणूक निर्णय अधिकारी | सूपूर्त करण्यात आलेला प्रभाग क्रमांक | नामनिर्देशनपत्रांचे वाटप, स्विकृती इत्यादी कार्यवाही करणेचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री किशोर पवार<br>उपजिल्हाधिकारी (रोहयो),<br>जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर | १४-क | निवडणूक कार्यालय<br>डॉ. द्वारकानाथ कोटणीस टाउन हॉल,<br>ICICI बँक म.न.पा. शाखेच्यावर,<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,<br>रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१ |

निवडणूक कार्यालय सोलापूर म.न.पा.

(डॉ.अविनाश ढाकणे)
आयुक्त
तथा मुख्य निवडणूक अधिकारी
सोलापूर महानगरपालिका